# स्त्रियश्चरित्रम् !

शांतानं मला असं अचानक का सोडून जावं ? आगाऊ कल्पना न देता ? कारण न सांगता ? माझ्या माघारी ?

त्या दिवशी सकाळी मी भाजी घेऊन घरी आलो आणि सोफासेट्सचे कव्हर्स नवीन खरेदी करायचे होते म्हणून पुन्हा बाहेर पडलो तेव्हा ती घरातच होती. मला चांगला टिकाऊ कपडा हवा होता आणि तोसुद्धा बैठकीच्या रंगाला मॅचिंग होणारा. म्हणून चार दोन दुकानं हिंडण्यात जरा जास्त वेळ गेला. घरी येऊन बैठकीत गेलो. कपडा मॅच होतो आहे हे पाहिलं अन् समाधानानं हुश्श करीत कोचावर बसलो. तर टिपॉयवर शांताची चिठ्ठी :

मी निघून जात आहे. कायमची. शोध घेण्याचा प्रयत्न करू नये.

– शांता

क्षणभर मला काही कळलंच नाही, मी काय वाचतो आहे ते. मी ती बोटभर चिठ्ठी पुन्हापुन्हा वाचली अन् शेवटी माझ्या डोक्यात लख्ख उजेड पडला.

शांता मला सोडून गेली होती. तीन वर्षांच्या वैवाहिक जीवनाचा त्याग करून. कुठं ? ते तिलाच माहीत. पण कां ?

सवयीनं ती चिठ्ठी मी माझ्या कपाटातील पत्रव्यवहाराच्या फाईलमध्ये व्यवस्थित ठेवली आणि पुन्हा कोचावर येऊन बसलो. विचार करीत.

आमचा तसा प्रेमविवाह वगैरे झाला नव्हता. ठरवूनच झाला होता. तरीपण माझं शांतावर अतिशय प्रेम होतं. मी स्त्रियांविषयी तसा क्रेझी नाही. मला स्त्री समजत नाही. तसाच स्त्रियांना पण माझं मन समजत नसेल. म्हणूनच लग्नानंतर शांताच माझ्या जीवनातील एकुलती एक स्त्री म्हणून उरलेली होती. तेव्हा माझं कुणा दुसरीवर मन वगैरे गेलं होतं अशी बातच नव्हती. अन् शांतालाही ते पुरेपुर माहीत होतं.

तिला काही कमी होतं का ?

आता हे खरं की मी तिला पॉकेटमनी असा दिला नव्हता. पण त्याच्यावाचून काही अडलं नव्हतं. मी तिच्या कोणत्याच मागणीला नकार दिल्याचं मला आठवत नव्हतं.

आठवड्यातून दोनकदा सिनेमा, हॉटेलिंग, इच्छेला येईल ते दागिने,

साड्या, पर्सेस, बांगड्या, सँडल्स वगैरे. दर रविवारी विकएंडला जाणं.

छे. छे. याबाबतीत तिला तक्रारीला मुळीच जागा नव्हती. उलट तिला जे जे हवं असेल ते ते खरेदी करायला जाण्यासाठी मी एका पायावर तयार असायचा. खरं सांगू का ? मला खरेदी करायला आवडतं. मला भाव माहीत असतात. कमीत कमी भावात चांगल्या प्रतीचा माल पदरात कसा पाडून घ्याव हे मला चांगलं कळतं. घासाघिस करायला मी कंटाळत नाही. इतर नवऱ्यांसारखा मी ह्या गोष्टींना कंटाळत नव्हतो-नाही. उलट मी तिच्याबरोबर दुकानं पालथी घालायचो, निवडित मदत करायचो, किंमतीच्या बाबतीत सल्ला द्यायचा. तिनं एखादी वस्तू मागितली अन् मी नाही म्हटलं असं झालेलंच नाही. अलीकडे तर मीच तिला काय हवं काय नको ते बघून आणून द्यायचा. आपणहून. तीच खरं सांगायचं तर, खरेदीबद्दल उदासीन झाली होती.

तुम्ही म्हणाल की, दोघांच्या स्वभावात, वृत्तीत फरक असल्यानं जमत नसेल. बेबनाव होत असेल. खटके उडाले असतील.

पण हे सगळं चूकच ठरेल आमच्या बाबतीत. आमचे खटके उडण्याचा प्रसंग येणारच कसा ? शांतानं माझ्या म्हणण्याला कधी विरोध दर्शवलाच नाही. खरं सांगायचं तर ती कधी फारशी बोलायचीच नाही. ऐकून घ्यायची. मीच जास्त करून बोलत असायचा. मला माहीत आहे. मी इतरांना अबोल वाटतो. पण शांताच्या बाबतीत अपवाद होता. मी तिच्याजवळ जितकं बोललो तितकं कोणाजवळ बोललो नसेन.

म्हणजे मी तिला बोअर करीत असे असं नाही बरं का? माझे बोलण्याचे विषय तिच्या आवडीचेच असत. वाढती महागाई, बाजारभाव, दागिने, घराची सजावट, खिडक्यांना लावायचे पडदे, फर्निचरची ठेवण, अलिकडच्या फॅशन्स, फराळाचे निरनिराळे पदार्थ चवदार बनविण्याच्या रीती वगैरे. नाहीतरी स्त्रियांचे आवडते विषय तरी कोणते असतात हो ? आणि हे सुद्धा काही कर्तव्य म्हणून नाही बरं का ? मलाही जात्याच आवड आहे त्यांची (आमच्या घरी येणाऱ्या फेमिनाच्या अंकावर पहिली उडी माझी)

एकदा तर मी तिला एक स्वेटरची वीण सप्रयोग समजावून सांगताना तिनं माझ्याकडे असं रोखून पाहिलं की बस्स ! मग मीच म्हणालो, राहू दे मीच करून टाकीन स्वेटर, तशी ती उठली. अन् एक कोणता तरी लठ्ठ ग्रंथ घेऊन वाचत बसली.

अनेक नवऱ्यांना नोकरी धंदा असतो. मित्रमैत्रिणी असतात. हॉबीज असतात. त्यात त्यांचा इतका वेळ मोडतो की, त्यांच्या बायकांच्या वाट्याला ते फारसे येतच नाहीत. त्यांना एकटं राहावं लागतं. त्यांचे दिवस कंटाळवाणे होतात. पण माझं तर तसंही नव्हतं.

घरची गडगंज इस्टेट. त्यामुळे नोकरी-धंदा करण्याची गरजच मला नाही. तुम्हालाही माहीत आहेच. तसेच शांताखेरीज मला कुणी मित्र नाहीत की मैत्रिणी नाहीत. हॉबीज ह्या अशा. त्यामुळे ती एकटी राहत असेल असं नव्हतंच. उलट मी तिच्या अवती-भोवती वावरत असायचो. ती स्वयंपाक घरात गेली की मलाही सुरसुरी यायची. भाजी चीर, तांदूळ धू, कोशिंबीर कर, असं लुडबुडत राहण्याची माझी सवय होती. तिची तब्येत ठीक नसली की मी तिला मागे सारायचा अन् इतका फर्स्ट क्लास स्वयंपाक करून वाढायचा की यंव ! अशा वेळी शांता थट्टेने म्हणायची सुद्धा की, तुम्ही चुकीनं पुरुषाच्या जन्माला आला म्हणून.

अहो ! तिच्या मित्र-मैत्रिणींना सुद्धा मी कंटाळत नसे की इतर नवऱ्यांसारखा बाहेर जात नसे. उलट त्यांच्या बोलण्यात भाग घेत असे. तिच्या मैत्रिणींच्या डिफिकल्टीज मीच शांतापेक्षा जास्त कौशल्याने सोडवत असे. तेव्हा तिच्या मैत्रिणी माझं इतकं कौतुक करीत अन् आपल्या नवऱ्यांबद्दल असं बोलत की मला अगदी लाजल्यासारखं होऊन जायचं. त्या शांताच्या भाग्याचा हेवा करीत तेव्हा शांता सुद्धा लाजेनं लाल व्हायची.

तिनं एकदा वेळ जावा म्हणून एका नाटकात भूमिका स्वीकारली. तेव्हा तिला नुसतं तालमीला पोहोचविणे, परत आणणे अशी जुजबी कामे इतर नवऱ्यांसारखा कुरकुरत मी करीत होतो असं नव्हे तर तिला तिच्या डायरेक्टरपेक्षाही जास्त खुबीनं मी तिची भूमिका समजावून सांगितली. तालमीचा पूर्ण वेळ मी तिथेच बसून असे. अन् तेही न कंटाळता. त्या नाटकाचा दिग्दर्शकही माझी सहनशीलता पाहून थक्कच झाला.

छे, छे, भैय्यासाहेब आमची जोडी अशी तुटण्यासाठी जमली नव्हती. अलग होण्यासाठी काही कारण नव्हतं. आपली स्तुती म्हणून नाही सांगत भैय्यासाहेब, पण जन्मोजन्मी माझ्यासारखा नवरा मिळावा म्हणून इतर बायका व्रत सुद्धा करीत असतील – पण शांता ?

मला हे कोडं सुटलं नाही. दिवसरात्र माझ्या मनाला कां ? कां? चा

भुंगा पोखरत आलेला आहे. (जरी माझे सारे व्यवहार शांतपणे चालत असलेले इतरांना दिसत असले तरी) म्हणून शांता आज अचानक मला एका तरुणाबरोबर दुकानात खरेदी करताना दिसल्यावर मी तिला जाब विचारण्यासाठी वळणार इतक्यात त्या दोघात बाचाबाची सुरू झाली. तिच्याबरोबर आलेल्या त्या तरुणाला ती साडी मुळीच पसंत नव्हती. त्याची पसंती वेगळीच होती.

शांताला भांडताना मी प्रथमच पहात होतो. इतक्या मोठ्या आवाजात सभोवतालच्या दुनियेचा विसर पडावा इतक्या आवेगाने.

मी असा अचंब्यानं पहात असतानाच तो तरुण हातवारे करीत ताडकन दुकानाबाहेर पडला अन् मागे वळूनही न पहाता ताडताड चालू लागला. अन् शांता ?

तिनं हातातली साडी तशीच फेकली. अन् त्याची मनधरणी करण्यासाठी त्याच्यामागे धावत सुटली. त्याची आर्जवं करीत - त्याच्या मागे मागे चालू लागली. त्याचा हात धरून लाडावलेल्या मांजरीसारखी त्याच्या अंगाला अंग घाशीत - भर रस्त्यात !